आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२८ मे २०२४ - मंगळवार

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यासाठी सर्व राजकीय पक्षांचा  जोरदार प्रचार सुरू आहे. रालोआ आणि इंडिया आघाडीचे नेते आज देशात विविध ठिकाणी प्रचारसभा घेणार आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज ओदिशामधल्या भद्रक लोकसभा मतदारसंघात प्रचारसभा घेणार आहेत.

उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, आज बिहारमधल्या पाटणा साहिब आणि पाटलीपुत्र लोकसभा मतदारसंघात प्रचार सभा घेत आहेत, तर बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार नालंदा लोकसभा मतदारसंघात रोड शो करणार आहेत.

राजदचे नेते तेजस्वी यादव बक्सर, सासाराम, जेहनाबाद आणि पाटलीपुत्र लोकसभा मतदारसंघातल्या प्रचारसभांना संबोधित करतील. तर विकासशील इन्सान पार्टीचे मुकेश सहनी इंडिया आघाडीच्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेणार आहेत.

**<><><><><>**

इंडिया आघाडी आणि तिचे घटक पक्ष भ्रष्टाचाराचं सर्वात मोठं उदाहरण असल्याची  टीका प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी केली आहे. ते आज झारखंडमध्ये डुमका लोकसभा मतदारसंघात पक्षाच्या प्रचारसभेत बोलत होते. झारखंडमधल्या यापूर्वीच्या सरकारनं इथल्या  आदिवासी जनतेकडे दुर्लक्ष केल्याचं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर गेल्या चार दिवसांमध्ये केलेल्या विविध कारवायांमध्ये एकूण १० किलो ६०० ग्रॅम सोनं आणि ८ कोटी ६८ लाख रुपये किमतीच्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंची तस्करी उघडकीला आणली असून, ३ जणांना अटक केल्याचं  सीमाशुल्क विभागानं काल जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. या व्यतिरिक्त  ३१ प्रकरणांमध्ये परदेशी चलन देखील  जप्त केल्याचं यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेनं काल संघटित मानवी तस्करी आणि सायबर गुन्हेगारीशी संबंधित पाच संशयित आरोपींना ताब्यात घेतलं. राज्य पोलीस दलांच्या  सहयोगानं राबवलेल्या या मोहिमेत एनआयए नं देशातली एकूण सहा राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये १५ ठिकाणी  छापे टाकले. यावेळी  डिजिटल उपकरणं, पासपोर्ट आणि बनावट रोजगार पत्र, यासारखं गुन्हेगारी स्वरूपाचं साहित्य जप्त करण्यात आलं.

**<><><><><>**

पुण्यामधल्या ससून रुग्णालयाच्या गेल्या ५ वर्षांच्या कामकाजाबाबत श्वेतपत्रिका काढून रुग्णालय प्रशासनाबाबतच्या तक्रारी दूर करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी  मागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी केली आहे. काही दिवसांपूर्वी अमली पदार्थ तस्करी प्रकरणी, तर आता कल्याणीनगर ‘हिट अँड रन’ प्रकरणी ससून रुग्णालयाची

प्रतिमा डागाळली आहे. या पार्श्वभूमीवर रुग्णालय प्रशासनाच्या कामकाजाची समीक्षा गरजेची असल्याचं त्यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

मुंबईत धारावी परिसरातल्या काळा किल्ला भागात आज सकाळी एका गोदामाला लागलेल्या आगीत सहा जण जखमी झाले. अग्निशामन दलाच्या जवानांनी आग आटोक्यात आणून गोदामात अडकलेल्यांची सुटका केली. जखमींना सायन रुग्णालयात दाखल केल्याचं संबंधित सूत्रांनी सांगितलं.

**<><><><><>**

पुण्यात खराडी बायपास भागात काल रात्री एका ट्रकनं दुचाकी वाहनाला धडक देऊन झालेल्या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला, तर एकजण गंभीररीत्या जखमी झाला. पोलिसांनी ट्रकचालकाला ताब्यात घेतलं आहे.

**<><><><><>**

नांदेड जिल्ह्यात मुदखेड तालुक्यातल्या पार्डी-राजवाडी पुलावरून आज सकाळी एक ट्रॅक्टर ट्रॉली कोसळली. अपघातात एक जण मृत्युमुखी पडला, तर दोन जण जखमी झाले. मुदखेड तालुक्यातील पार्डी वैजापूर येथून ट्रॅक्टर मुदखेडकडे येत असतांना काल सकाळी हा अपघात झाला. मुदखेड पांढरवाडी रस्त्यादरम्यान अरुंद पुलामुळे हा अपघात झाल्याचं प्रत्यक्षदर्शींनी सांगितलं.

**<><><><><>**

छत्तीसगड राज्यात विविध चकमकींमध्ये सहभाग असलेल्या एका नक्षलवाद्यानं आज गडचिरोलीत केंद्रीय राखीव दलाच्या पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. २०१७ मध्ये छत्तीसगडच्या मिरतूर आणि २०२२ मध्ये तिम्मेनार इथं झालेल्या चकमकींमध्ये त्याचा सहभाग होता. महाराष्ट्र शासनानं त्याच्यावर ५ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केलं होतं. २०२२ पासून आतापर्यंत २२ नक्षल्यांनी गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं आहे.

**<><><><><>**

अखिल भारतीय फूटबॉल महासंघानं काल  उजबेकिस्तानबरोबरच्या दोन मैत्रीपूर्ण लढतींसाठी २३ खेळाडूंचा महिला फूटबॉल संघ जाहीर केला. या संघात तीन गोलकीपर्स, आठ डिफेंडर्स, आठ मीड फिल्डर्स आणि चार फॉरवर्ड्स चा समावेश आहे. येत्या  ३१ मे आणि ४ जून रोजी ताश्कंद मध्ये हे  सामने होणार आहेत.

//<><><><><>//